राज्य गॅझेटिअर मालिकेत मराठी संगीत रंगभूमी या विषयावर गॅझेटिअर प्रकाशित करण्याकरिता स्थापित मुख्य समितीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : दर्शनि-२०२२/प्र.क्र.२३४/(ई-८५३८६३)/सां.का.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ४ सप्टेबर, २०२६

संदर्भ : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. दर्शनि-२०२२/प्र.क्र.२३४/ सां.का.२, दि.०९.१२.२०२२

२.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक दर्शनि-२०२३/प्र.क्र.२०६/ सां.का.२, दि.०३.११.२०२३

३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक दर्शनि-२०२३/प्र.क्र.२०६/ सां.का.२, दि.११.०६.२०२६

४. कार्यकारी संपादक तथा सचिव, दर्शनिका विभागा यांचे जा.क्र.दर्शा-४६०, दि.२३.०४.२०२६ रोजीचे पत्र

प्रस्तावना :

राज्य गॅझेटिअर हे महाराष्ट्राचा परिचय करुन देणारा ग्रंथ आहे. राज्याच्या वैशिष्ट्यपूर्ण विषयावर आधारित या गॅझेटिअर ग्रथांचा सर्वसमावेशक वाचक वर्ग आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, पर्यटक यांचा अंर्तभाव असतो. वैशिष्ट्यपूर्ण विषयांचा समावेश असणारा गॅझेटिअर ग्रंथ सर्वसामान्य वाचकांची उत्कंठा वाढविणारा व प्रेरणादायी ठरतो. असा राज्य गॅझेटिअर ग्रंथ दर्शनिका विभागाकडून प्रकाशित करण्यात येतो.

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मराठी संगीत रंगभूमीच्या शतकोत्तर अमृत महोत्सवाच्या निमित्ताने दर्शनिका विभागामार्फत राज्य गॅझेटिअर मालिकेत "मराठी संगीत रंगभूमीचा १७५ वर्षाचा इतिहास" या विषयावर स्वतंत्र राज्य गॅझेटिअर (दर्शनिका) स्वरुपात (शब्दस्वर लेण्यांची संगीत नाट्य गौरवगाथा या ग्रंथाच्या उर्वरित तीन खंडाचे) (खंड-१ पूर्वरंग व उत्तररंग, खंड-२ व खंड-३) तीन खंडात प्रसिध्द करण्याच्या कामी मार्गदर्शन व सल्ला देण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य समिती गठीत करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयान्वये "मराठी संगीत रंगभूमीचा १७५ वर्षाचा इतिहास" या विषयावर आधारीत मराठी संगीत रंगभूमी (शब्दस्वर लेण्यांची संगीत नाट्य गौरवगाथा) या ग्रंथाच्या तीन खंडांचे (खंड-१ पूर्वरंग व उत्तररंग, खंड-२ व खंड-३) प्रकाशन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी खंड-१ (पूर्वरंग) माहे जानेवारी २०२४ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. सदर तिन्ही खंड प्रसिध्द करण्याच्या कामी मार्गदर्शन व सल्ला देण्याचे काम समिती करते.

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्य गॅझेटिअर मालिकेत मराठी संगीत रंगभूमी या विषयावार गॅझेटिअर प्रकाशित करण्याकरिता गठीत मुख्य समितीची मुदत दि.०८.१२.२०२५ संपुष्टात आली आहे. संदर्भाधिन क्र.४ येथील पत्रान्वये कार्यकारी संपादक तथा सचिव यांनी मुख्य समितीस मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार सदर मुख्य समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिनस्त दर्शनिका विभागामार्फत राज्य गॅझेटिअर मालिकेत "मराठी संगीत रंगभूमीचा १७५ वर्षाचा इतिहास" या विषयावर स्वतंत्र राज्य गॅझेटिअर (दर्शनिका) स्वरुपात (शब्दस्वर लेण्यांची संगीत नाट्य गौरवगाथा या ग्रंथाच्या उर्वरित तीन खंडाचे) (खंड-१ उत्तररंग, खंड-२ व खंड-३) तीन खंडात प्रसिध्द करण्याच्या कामी मार्गदर्शन व सल्ला देण्याच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या मुख्य समितीस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर समितीची मुदत या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन वर्ष किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. तसेच मराठी संगीत रंगभूमी शतकोत्तर अमृत महोत्सव गॅझेटिअरसाठी मुख्य समितीची रचना व मुख्य समिती सदस्यांची कर्तव्ये ही पुढीलप्रमाणे आहे.

मुख्य समितीची रचना

अ.क्र.	नावे	पदनाम
१.	मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य	पदसिद्ध अध्यक्ष
२.	संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय	शासकीय सदस्य
३.	डॉ. वंदना घांगुर्डे	अशासकीय सदस्य
४.	डॉ. मुकुंद राममराठे	अशासकीय सदस्य
५.	श्री. शौनक अभिषेकी	अशासकीय सदस्य
६.	श्री. ज्ञानेश पेंढारकर	अशासकीय सदस्य
७.	श्री. संजय गोसावी	अशासकीय सदस्य
८.	श्रीमती मेधा गोगटे- जोगळेकर	अशासकीय सदस्य
९.	श्री. चारूदत्त आफळे	अशासकीय सदस्य
१०.	कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग	सदस्य सचिव

मुख्य समिती सदस्यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील.

१. सदर गॅझेटिअर ग्रंथाच्या धोरणात्मक बाबी ठरविणे उदा. उप समिती तथा विषयतज्ञ सल्लागार मंडळ स्थापन करणे तसेच विषयतज्ञांच्या मदतीने सहयोगकर्ता लेखनकर्त्यांचे नावे सुचविणे व सदर नावाने मान्यता देणे व इतर धोरणात्मक बाबी.

२. सदर गॅझेटिअरच्या खंडातील लेखनाचा दर्जा सुधारणे व वैशिष्टयपूर्ण ठरण्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना करणे.
३. सदर गॅझेटिअर ग्रंथामध्ये अंर्तभूत करावयाच्या मजकुराची छाननी, लेखन दुरुस्त्या, मजकूर छपाईस पाठविण्यास मंजूरी तसेच सदर मजकूरासंबंधी सामूहीक जबाबदारीच्या तत्वाप्रमाणे जबाबदारी स्विकारणे व त्यास मान्यता देणे.
४. सदर गॅझेटिअर ग्रंथांच्या प्रत्येक खंडाची रुपरेषा तसेच सदरचा खंड वैशिष्टयपूर्ण ठरण्यासाठी त्यामध्ये समाविष्ठ करावयाच्या बाबीची छाननी करणे तसेच सदर खंड विहित मुदतीत प्रकाशित करण्याच्या दृष्टीने बैठका आयोजित करुन सल्ला व मार्गदर्शन करणे.

३. याबाबतचा होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "**मागणी क्र. झेडडी-१, २२२०- माहिती व प्रसिध्दी, ६०-इतर, ११०-प्रकाशने, (०१) महाराष्ट्र राज्य समिती, (०१) (०१), भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास समिती, महाराष्ट्र राज्य, (२२२००४९१) (कार्यक्रम), (१३) कार्यालयीन खर्च, (१६) प्रकाशने व (२८) व्यावसायिक सेवा**" या उद्दीष्टातून त्या-त्या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या निधीतून भागविण्यात येईल.

४. वरील समितीतील अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व दैनिक भत्ता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० व बैठक भत्ता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दिनांक २४ मे, २०१२ अन्वये मंजूर करण्यात यावा. मात्र या अशासकीय सदस्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. प्रवासभत्ता,दैनिकभत्ता व बैठकभत्ता यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करेल ते या अशासकीय सदस्यांना लागू राहतील.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०९०४१५२२२८७०४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GITA N YADAV

Digitally signed by GITA N YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=84EC8C867E1772471 30C5B2CE9EBE952BC911B16D489B87589C254E58ADC24EC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=86C33C507529F3B895BCCC45E562FC0EBC4D9E29CBB4691C6759762E25DEC5EA, cn=GITA N YADAV
Date: 2026.09.04 15:23:30 +05'30'

(गिता यादव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य), मंत्रालय, मुंबई ४० ०३२
२. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, मुंबई
३. महालेखापाल, लेखा परीक्षा, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

५. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. उप सचिव (व्यय-१५) वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
८. अवर सचिव (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१०. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई
११. समितीचे वरील सर्व सदस्य (कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई यांच्या मार्फत)
१२. निवड नस्ती , सां.का.२